दि. २७ जून २०२३ रोजी डोंबिवलीतील के. व्ही. पेंढरकर महाविद्यालयात माजी रेल्वेमंत्री आणि ज्येष्ठ समाजवादी नेते दिवंगत मधू दंडवते यांच्या नावाने रसायनशास्त्राची प्रयोगशाळा सुरू करण्यात आली आहे. कायक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुरेश गोरे आणि डॉ. विवेक सावंत होते. दंडवते यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ही प्रयोगशाळा सुरू करण्यात आली आहे. डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर देसाई यांच्या संकल्पनेतून या प्रयोगशाळेची उभारणी करण्यात आली. या प्रयोगशाळेचे उद्घाटन करताना डॉ. सावंत बोलत होते.

पेंढरकर महाविद्यालयात आयोजित या कार्यक्रमाला रसायनशास्त्राचे तज्ज्ञ डॉ. सुरेश गोरे, डॉ. विवेक सावंत, संस्था अध्यक्ष प्रभाकर देसाई, अभिजित देसाई, संस्था संचालक सनदी लेखापाल उमेश पटवारी, डॉ. प्रशांत राव, उद्योजक आनंद आचार्य, प्राचार्य डॉ. किशोर फालक उपस्थित होते.

वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या आणि क्वॉटम रसायनशास्त्रातील तज्ज्ञ अन्जेला मर्केल यांनी जवळील वैज्ञानिक दृष्टिकोनाचा उपयोग करून जर्मनीची अफाट प्रगती केली. यामध्ये त्यांनी मानवतेला प्राधान्य दिले. केवळ जर्मनीतच नव्हे तर युरोपात सर्वाधिक विविधांगी प्रगतीची झेप घेणारा देश म्हणून जर्मनीची ओळख राहिली. आपल्या दृष्टिकोनातून जगाच्या प्रगतीसाठी अन्जेला यांनी खूप योगदान दिले. अशीच संधी भौतिकशास्त्राचे प्राध्यापक असलेल्या मधू दंडवते यांना चालून आली होती. नक्कीच त्यांच्या दूरदृष्टीचा भारत देशाला लाभ झाला असता असे डॉ. सावंत म्हणाले. हम्फ्रे डेव्ही यांच्या प्रयोगशाळेतील पुस्तक बांधणी चौथी शिकलेला कामगार मायकेल फॅरेड याने हम्फ्रे डेव्ही यांची व्याख्याने लिहून काढली. आपल्या बुद्धीकौशल्याने प्रयोगशाळेत काहीतरी करायचे म्हणून रसायनांची हाताळणी करताना अद्वितीय असा शोध लावला. प्रयोगशाळेतील हाताळणीतून आपणास खूप काही शिकण्यास मिळते. चौकटबद्ध विज्ञानात न अडकता विशाल दृष्टिकोन ठेवून विज्ञानाच्या विविध अंगांचा अभ्यास करा. हार्डवेअर आणि ब्रेनवेअर यांच्या संयोगातून शोधाचा जन्म होतो. शोधासाठी वस्तू ही निमित्त असली तरी बुद्धीसामर्थ्य हे शोधाचे बळ आहे, हे विसरू नका, असा सल्ला डॉ. सावंत यांनी विद्यार्थ्यांना दिला.

मानवी बुद्धीकौशल्य कृत्रिम बुद्धिमत्ता एकाच गाडीची दोन चाके आहेत. या दोन्ही कौशल्यांचा अधिकाधिक वापर करून प्रगती, नवे शोध लावण्यासाठी प्रत्येकाने आपल्या क्षमता वाढवून समर्पित भावाने प्रयत्न केले तर मानवी जीवन समृद्ध होण्यास नक्कीच हातभार लागेल. त्यादृष्टीने आपल्या प्रयोगशाळेचा वापर करा, असे आवाहन डॉ. सावंत यांनी केले.

पूर्वी साधने कमी होती तरी शोध लागत होते. आता नवीन साधने आली आहेत. वैज्ञानिक संशोधन थांबलेले नाही, त्यामुळे शोधासाठी वस्तू हे निमित्त आहे. आपल्या बुद्धी कौशल्याचा सामर्थ्याने वापर करा. विज्ञानाला ठराविक शिक्के लावून त्याला बंदिस्त करू नका. नवीन संशोधन करुन प्रगतीची नवीन शिखरे चढा. पेंढरकर कॉलेजमधील प्रयोगशाळा ही अंतीम चढाईचा तळ आहे असे समजून त्याचा वापर करा, असे डॉ. गोरे यांनी सांगितले.






